


**माधवी मित्र**
**मोबाईल: +91 7709160834**

आपापल्या क्षेत्रात नेत्रदीपक यश मिळवून शाळेचे नाव उज्वल करणाऱ्या मुलींमधे माझी पण एक मैत्रीण आहे हा विचार सुखद वाटतो.
माधवी आठवले, ग.ग.हायस्कूल. ५७—५८बॅच. म्हणजेच माझी मैत्रीण माधवी मित्र. M.Com.ला पुणे विद्यापीठांतून सर्व प्रथम क्रमांक. नंतर U.G.C. ची fellowship मिळवून Business Administration ह्या विषयामधे पुणे विद्यापीठातील पहिली Ph.D.होण्याचा सन्मान तिने मिळवला.

पहिली पाच वर्षे किर्लोस्कर Consultants मधे Management Consultant म्हणून काम केले. नंतर दोन वर्षे XLRI ह्या जागतिक दर्जाच्या इन्स्टिट्यूटमधे Associate Professor म्हणून नवीन अनुभव मिळवला. कुटुंबाच्या द्दष्टीने शैक्षणिक क्षेत्रावरच लक्ष केंद्रित करावयाचे असे ठरवून नंतर मॉडर्न कॉलेजमधे लेक्चररशिप स्वीकारली. या काळात उपप्राचार्य म्हणूनही एक वर्ष काम केले.

कॉलेजमधे शिकवण्याच्या या काळामधे पाठ्यपुस्तके लिहिणे चालू होते. त्याचबरोबर Personnel Management या विषयावर संदर्भ ग्रंथ म्हणून कर्मचारी व्यवस्थापन या नावाचे एक पुस्तक मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांकरिता लिहिले होते. विद्यार्थी वर्गाला एकत्र करून वेगवेगळ्या क्षेत्रांशी त्यांचा परिचय व्हावा म्हणून नवनवीन प्रकल्प देण्याचा तिचा प्रयत्न असायचा.
तिने कॉलेजच्या सर्व  कर्मचाऱ्यांना  एकत्र करून  ट्रेड युनियन स्थापन करून तीन वर्षे ती यशस्वीपणे चालवली होती.

Economic Times, Financial Express यांसारख्या अर्थकारणांशी संबंधित वर्तमानपत्रातून, तसेच इतरही Professional Journals मधून Management ह्या विषयावर ती लेखन करीत असे. Labour Management हा विषय असल्यामुळे कर्मचारी आणि व्यवस्थापन ह्यांच्यातील संवाद तसेच औद्योगिक संबंध अशा विषयांवर राज्यस्तरीय आणि राष्ट्रीय स्तरावर पण तिचे अनेक शोध निबंध प्रसिद्ध झाले आहेत.भारतीय युवाशक्तीसारख्या संस्थांमधे जागतिक पातळीवर काम करून, विशेषतःअपंग युवकांमधून उद्योजक निर्माण करणाऱ्या संस्थेसाठी तिने काम केले. हे सर्व चालू असतांना स्त्रीमुक्तीसाठी काम करणाऱ्या बायजा मासिकासाठीही पुष्कळ लेखन, संपादन वगैरे जबाबदाऱ्या उत्तम रीतीने निभावल्या.

या सर्व यशाची आणि जीवनाची सुरुवात गोखले इन्स्टिट्यूटमधून झाली असे म्हणायला हरकत नाही. तिथल्या लायब्ररीचा भरपूर लाभ घेता आलाच. लायब्ररीतलल्या डॉ.नामजोशींनी दिलेल्या प्रोत्साहनाची अजूनही तिला आठवण येते. गोखले इन्स्टिट्यूटमुळेच अशोक मित्र या सहाध्यायीशी ओळख झाली. मैत्री, प्रेम आणि विवाह सर्व तिथेच जमले. ५० वर्षांपूर्वी माधवीने आंतरप्रांतीय आणि आंतरजातीय जोडीदार निवडला. दोन्ही कुटुंबे छान जोडली गेली. पोलिओमुळे आलेले अपंगत्व लहानपणापासूनच होते. आईवडील,इतर कुटुंबीय तसेच अशोक आणि त्याचे कुटुंब कोणालाही ते कधीच जाचले नाही,जाणवले नाही. मुलीला वाढवतांना

अशोकच्या समंजस सहभागाची साथ मिळाली. यशस्वी कारकीर्दीच्या आणि सुजाण सुफळ संसाराच्या घडणीत दोघांचे सदैव आनंदी, उत्साही आणि आशावादी व्यक्तिमत्व उजळून निघाले.

कामासंबंधात कुठलीही तडजोड न केल्यामुळे यश मर्यादित होते याचा अनुभव माधवीने घेतला, पण आपण आपल्या तत्वांशी प्रामाणिक राहिलो याचा तिला अभिमान आहे.
ग.ग.हायस्कूलमधे मुलींनी निवडलेल्या प्रतिनिधींचे मंत्रिमंडळ बनवण्याचा शाळेचा उपक्रम होता. प्रत्यक्ष निवडणुकीत पंतप्रधान म्हणून निवडून आलेल्या माधवीने भविष्यांत आपली निवड सार्थ ठरवली.

ग.ग.गुणवंत स्त्रिया ह्य सदराखाली लिहिलेली ही माहिती व हा लेख सर्वस्वी माझा आहे.
ग.ग.संबंधी WhatsApp, G.G.Group ब्लॉग
फेसबुक तसेच स्मरणिकेत प्रसिद्ध करण्यास
मी स्वखुशीने संमती देत आहे.

नांव: चारुमती केळकर-केतकर
मोबाईल नं: 9833421255.
ग.ग.बॅच ग्रुप.1956--1957.